महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,

वाणिज्य विभाग, प्रकाशगड- ५ वा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

फोन (वै)२६४४७७५३ (का)२६४७४२११, फॅक्स २६४७४३६६

क्र. पी-आर-३/जनरल/२०९५२ दिनांक:१९/७/२००६

## वाणिज्य परिपत्रक क्र.३८.

विषय: दुष्काळग्रस्त गांवातील कृषी ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडीत न करण्याबाबत.

संदर्भ: शासनाचे उप सचिव (ऊर्जा) महाराष्ट्र शासन यांनी संचालक (संचलन) म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित यांना संबोधित केलेले सं.-२००६/पत्र क्रं.९७६५/ऊर्जा -५ दिनांक १०.५.२००६.

----------------------

संदर्भाधीत पत्राव्दारे कळविण्यात येते कि, शासनाचे वर्ष २००५-२००६ या वर्षाकरिता राज्यातील अनुक्रमे खरीप (३४२५ गावे) व रब्बी (६८६ गावे) हंगामासाठी टंचाईग्रस्त जाहिर केलेली आहेत.,अशा गांवामध्ये अंतिम पैसेवारीची वाट न पाहता तसेच सदर तालुक्यातील सर्व रब्बी गांवामध्ये टंचाई परिस्थिती जाहीर करुन टंचाई परिस्थितीत कृषी ग्राहकांना अनुदेय सर्व सवलती देण्यात याव्यात. या अनुषंगाने सर्व संबंधित क्षेत्राधिका-यांना सूचना देण्यात येत आहेत की, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार दुष्काळग्रस्त गांवातील कृषी ग्राहकांचा विद्युत पुरवठा वीज देयकाच्या थकबाकीसाठी खंडीत करण्यात येऊ नये. अशा दुष्काळग्रस्त गांवातील कृषी ग्राहकांना प्रचलित वीज दरात द्यावयाच्या अनुदानासंबंधी स्वतंत्रपणे सूचना निर्गमित करण्यात येतील.

संदर्भाधिन शासन पत्राची प्रत त्वरित संदर्भासाठी व माहितीसाठी सोबत जोडली असून खरीप (३४२४ गावातील) व रब्बी (६८६ गावातील) दुष्काळग्रस्त गांवाची यादी त्वरित जिल्हाधिका-यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी व त्यानुसार आवश्यक कार्यवाही करावी.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

प्रति,

मुख्य अभियंता,म.रा.वि.वि.कं.मर्या.,सर्व परिमंडळे.

अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सर्व मंडळे.

कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सर्व विभागिय कार्यालये.

उप कार्यकारी अभियंता/सहाय्यक अभियंता , म.रा.वि.वि.कं.मर्या.,सर्व उपविभागिय कार्यालये.



Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com